| PUBLICATION | DATE | EDITION |
| --- | --- | --- |
| Saanj Samachar | September 15, 2011 | Pune |

# ट्रायकॉमच्या फ्रुट प्रॉडक्टस्‌ची विस्तार योजना

पुणे :- ट्रायकॉम फ्रुट प्रॉडक्टस् लिमिटेड (बीएसई-५३१७१६, एएसई-४९१८७) फलोत्पादन प्रक्रियेमध्ये असलेली कंपनी असून या कंपनीने एका वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर आता विस्ताराची योजना जाहीर केली आहे. कंपनीचा उत्पादन प्रकल्प पुण्याजवळ अन्दुरी गावात आहे.

फलोत्पादन प्रक्रियेची सुरूवात केल्यानंतरच्या या एका वर्षाच्या वाटचालीत ट्रायकॉम फ्रुटस्‌ने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वत:ची विश्वासार्ह प्रतिमा निर्माण केली आहे. पहिल्या वर्षात निर्यात बाजारपेठेत आपले पाय घट्ट रोवल्यानंतर आता स्थानिक बाजारपेठेत ठसा उमटविण्याची ट्रायकॉम फ्रुटस्‌ची योजना आहे. नवीन फळे आणि भाज्यांचा अर्क यांवर प्रक्रिया करून नवीन उत्पादने विकसित करण्यावर या कंपनीचा मुख्य भर असणार आहे.

सध्याची उत्पादनक्षमता दुप्पट करण्याचा कंपनीचा मानस असून आंबा आणि डाळिंबावरील प्रक्रिया प्रत्येक तासाला १० टनाच्या क्षमतेवरून ताशी २० टन आणि पेरू, पपई, टोमॅटो व आवळ्यावरील प्रक्रिया ताशी ५ टनावरून १० टनापर्यंत करण्याचा विचार आहे. आमरस प्रक्रियेची यशस्वी चाचणी केल्यानंतर कंपनी आता केळे आणि पेरू यांच्या रसाची चाचणी करून त्या उत्पादनांच्या बाबतीत किती संधी उपलब्ध आहे याची चाचपणी करणार आहे.

उर्जेच्या बाबतीत सक्षम असलेली रचना आणि अधिक चांगले प्रक्रिया नियंत्रण असलेल्या प्रक्रिया पध्दतीची क्षमता वाढविण्याकडे ट्रायकॉम फ्रुटस्‌ने लक्ष केंद्रित केले आहे.